आजचा सुविचार

वेळ, सत्ता, संपत्ती आणि शरीर
साथ देवो न देवो,
परंतु चांगला स्वभाव आणि चांगले संबंध
कायम आयुष्यभर साथ देतात.

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १८१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१२ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# पुण्यात म्हाडाच्या घरांची नवी 'धमाकेदार' ऑफर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, पुणे :** पुणे आणि आसपासच्या परिसरात हक्काचं घर घेण्याचं स्वप्न पाहणाऱ्या नागरिकांसाठी म्हाडाने आनंदाची बातमी दिली आहे. सध्या सुरू असलेल्या ४१८४ घरांच्या सोडतीनंतर लगेचच, येत्या मार्च महिन्यात पुणे मंडळातर्फे आणखी ३००० परवडणाऱ्या घरांसाठी नवीन लॉटरी काढली जाणार आहे. पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे (म्हाडा) सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.




**२ लाखांहून अधिक अर्जांचा पाऊस...**

पुणे जिल्हा परिषदेच्या शरदचंद्र पवार सभागृहात नुकतीच पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली येथील विविध प्रकल्पांतील ४१८६ घरांसाठी संगणकीय सोडत पार पडली. या घरांसाठी तब्बल २ लाख १५ हजार ९६५ अर्ज प्राप्त झाले होते.

**पुढील 'डेस्टिनेशन' कोठे?**

म्हाडाच्या मार्चमधील आगामी सोडतीसोबतच, शिरूर येथे ५७४ सदनिका आणि खराबवाडी येथे १९४ व्यापारी गाळ्यांचे काम वेगाने सुरू आहे. ताथवडे येथील फेज-१ पूर्ण झाला असून, फेज-२ मधील ८० टक्के काम झाले आहे. लवकरच तेथील ७५० निवासी व अनिवासी गाळे सोडतीसाठी उपलब्ध होतील. याशिवाय म्हाळुंगे, सोलापूर, बारामती आणि पुरंदर येथेही नवीन गृहप्रकल्प आकारास येत आहेत.

**बिल्डरांच्या मनमानीला चाप**

खासगी विकासकांकडून २० टक्के योजनेतील घरांसाठी जास्तीचे पैसे मागितल्याच्या तक्रारींची म्हाडाने गंभीर दखल घेतली आहे. अशा अनेक प्रकरणांत मध्यस्थी करून वाढीव शुल्क रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, विजेत्यांना ५० टक्के पार्किंग मिळणे अनिवार्य असल्याचे आढळराव पाटील यांनी स्पष्ट केले. चंदनगर-खराडी येथील १५ गुंठे जमिनीवरील अतिक्रमण हटवून ती जमीन आता म्हाडाच्या ताब्यात आली आहे.

**पारदर्शकता आणि पुढील प्रक्रिया...**

'म्हाडा'चे उपाध्यक्ष अनिल वानखडे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधताना सांगितलं की, जमिनींची उपलब्धता वाढल्याने भविष्यातही परवडणारी घरे देणे शक्य होईल. ही संपूर्ण प्रक्रिया मानवी हस्तक्षेप विरहित आणि पारदर्शक आहे. पुणे मंडळाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे यांनी विजेत्यांना सूचना दिल्या की, त्यांनी 'आयएचएलएमएस २.०' (खक्कञ्चड २.०) या प्रणालीद्वारे विहित मुदतीत घराचा स्वीकार किंवा नकार कळवणे आवश्यक आहे. कागदपत्रांची पूर्तता लवकरात लवकर ऑनलाइन केल्यास घराचे देकारपत्र त्वरित मिळेल. तसेच, २० टक्के योजनेतील उरलेली घरे 'बुक माय होम' पोर्टलवर 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर दिली जातील.

# भारतातला पहिला संगीतमय रोड

## मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्घाटन



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, मुंबई :** मुंबईचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारी रस्त्याला (कोस्टल रोड) आता नवी ओळख मिळाली आहे. मुंबईच्या वाहतुकीत महत्त्वाची भूमिका बजावणारा हा मार्ग आता देशातला सर्वांत पहिला संगीतमय रस्ता म्हणून ओळखला जाणार आहे. या रस्त्याचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत अमरसन्स गार्डन जवळ करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वाहन या संगीतमय पट्ट्यांवरून धावत स्लमडॉग मिलेनियर या चित्रपटातील लोकप्रिय 'जय हो' गाण्याच्या संगीताचा आवाज ऐकू आल्यावर त्यांच्या समवेत वाहनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी खासदार राहुल शेवाळे, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे, हंगेरी देशाचे कौन्सिल जनरल फ्रेंक जारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना म्हणाले,

**थोडक्यात संगीतमय रस्ता...**

- भारतातला पहिलावहिला संगीतमय रस्ता
- दक्षिणेकडून उत्तरेकडे जाताना मरीन ड्राइव्ह वरील बोगदा संपल्यावर संगीतमय रस्त्याचा प्रारंभ
- पहिल्या मार्गिकेवर पहिल्या टप्प्यात ५०० मीटर पर्यंत विशेष पट्ट्या.
- रस्त्यावरील विशेष पट्ट्या आणि ६० ते ७० च्या गतीने जाणाऱ्या वाहनाच्या चाकांच्या घर्षणातून स्वरांची निर्मिती.
- वाहनातील प्रवाशांना कोणत्याही वेगळ्या उपकरणाशिवाय वाहनात ऐकू येतोय 'स्लमडॉग मिलेनियर' चित्रपटातील 'जय हो' गाण्याचे संगीत.

धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारी मार्गावरून उजवीकडील मार्गिकेवर प्रवास करताना संगीतमय रस्त्याचा अनुभव येणार आहे. ही अभिनव संकल्पना आहे. वाहनचालकांना अद्ययावत हंगेरियन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने 'जय हो' या स्लमडॉग मिलेनियर या चित्रपटातील जगप्रसिद्ध गाण्याची धून ऐकण्याची पर्वणी मिळणार आहे. पहिल्या टप्प्यात या रस्त्यावर ५०० मीटर लांब विशेष संगीतमय रिब्स (पट्ट्या) बसविण्यात आल्या आहेत.

या पट्ट्यांमधील विशिष्ट अंतर आणि त्यावरून ताशी ६० ते ७० किलोमीटर प्रति वेगाने जाणाऱ्या वाहनाच्या चाकाचे होणारे घर्षण यामुळे स्वरांची निर्मिती होते. हे स्वर त्या वाहनातील प्रवाशांना ऐकू येतील. आंतरराष्ट्रीय दर्जाचे अद्ययावत तंत्रज्ञान, भारतीय संस्कृती आणि संगीताचा सुंदर मिलाफ म्हणून संगीतमय रस्ता देशभरात कुतूहलाचा विषय ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

# मुंबईचे महापौर, उपमहापौर व पदाधिकारी सामान्य मुंबईकरांचे स्वप्न पूर्ण करतील - मुख्यमंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, मुंबई :** बृहन्मुंबई महापालिकेच्या महापौरपदी भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका रितू तावडे व उपमहापौरपदी शिवसेनेचे संजय घाडी यांची निवड झाली. त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोघांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.



महापौर, उपमहापौर व सर्व पदाधिकारी या महापालिकेला दिशा देतील व सामान्य मुंबईकरांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम करतील. त्यांना पूर्ण ताकद देण्याचे काम आम्ही करू. त्यांच्या माध्यमातून नवीन मुंबई घडविण्याच्या कामाला गती देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहात महापौर व उपमहापौर निवड झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे माध्यमांशी बोलत होते. यावेळी मुंबई शहराचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, माजी खासदार राहूल शेवाळे, आमदार अमित साटम, प्रविण दरेकर, चित्रा वाघ, आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, रितू तावडे यांच्याकडे एक अनुभवी व अस्सल मराठी चेहरा म्हणून पाहिले जाते. त्यांनी यापूर्वीही मुंबईकरांच्या प्रश्नांकरिता आक्रमक भूमिका घेतली आहे. यापुढेही त्यांच्या माध्यमातून महायुती सरकारने सुरू केलेला मुंबईच्या विकासाचा कार्यक्रम महापालिकेच्या माध्यमातून अतिशय चांगल्या पद्धतीने राबविला जाईल. उपमहापौर संजय घाडी यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेला मिळेल. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांना अपेक्षित अशा प्रकारचे प्रशासन महापालिकेच्या माध्यमातून चालविले जाईल.

महानगरपालिका ही लोकशाहीचे अंग आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे तेथे प्रशासक होते. तेथे लोकप्रतिनिधींचे लोकशाहीला अपेक्षित राज्य प्रस्थापित झाले याचा मला आनंद आहे. जनसामान्यांना आपले लोकप्रतिनिधी अधिक जवळचे वाटतात, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या सभागृहाच्या गॅलरीत मी पहिल्यांदाच बसलो. अशा प्रकारे मी पहिल्यांदाच सभागृहाचे कामकाज पाहिले आहे. अशा ऐतिहासिक व वारसा असलेल्या वास्तूमध्ये महत्त्वाच्या सोहळ्याचे साक्षीदार होणे हे महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, अतिशय कार्यक्षम महापौर व उपमहापौर मिळाले आहेत. गेल्या साडेतीन वर्षात मुंबईच्या विकासाला चालना दिली. त्या कामाची पोचपावती मुंबईकरांनी दिली. विकासाला प्राधान्य व विकासाला मुंबईकरांनी स्वीकारले आहे. मुंबई जागतिक दर्जाचे शहर करण्याची भूमिका आहे. मुंबई शहरासाठी जे जे आवश्यक आहे ते ते करण्याचे काम आम्ही करू. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम सरकार करणार. त्यांचे झोपडपट्टीमुक्त मुंबई करण्याचे काम आम्ही सुरू केले आहे. मुंबई खड्डेमुक्त रस्ते, प्रदूषणमुक्त करण्याची आमची भूमिका आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुंबईला फिनटेक कॅपिटल करण्याचे स्वप्न पाहिले आहे, ते पूर्ण करण्याचे काम शासन करेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# ठाण्यात वाहतूक कोंडीवर
## पार पडली महत्त्वपूर्ण बैठक

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**



**दि.११, ठाणे :** ठाणे शहरातील दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेता, त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी आमदार निरंजन डावखरे यांनी आज वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांच्यासोबत अत्यंत महत्त्वपूर्ण व फलदायी बैठक घेतली.

या बैठकीत ठाणे शहरातील प्रमुख चौक, अंतर्गत रस्ते तसेच ठाणे रेल्वे स्थानक परिसरात वारंवार निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. विशेषतः कार्यालयीन वेळा, शाळा-महाविद्यालयांची वेळ आणि सण-उत्सवांच्या काळात वाढणारी वाहतूक कोंडी कशी कमी करता येईल, याबाबत विविध पर्यायांवर विचारमंथन झाले. सध्या सुरू असलेल्या इयत्ता १० वी व १२ वीच्या बोर्ड परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना वेळेवर परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचताना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी विशेष वाहतूक नियोजन राबवण्यावर बैठकीत भर देण्यात आला. परीक्षा कालावधीत प्रमुख मार्गांवर वाहतूक नियंत्रण वाढवणे, आवश्यक ठिकाणी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करणे आणि रिक्षा-टॅक्सी थांब्यांचे योग्य नियोजन करण्याबाबत ठोस निर्णय घेण्यात आले.

यावेळी आमदार निरंजन डावखरे यांनी सांगितले की, ठाणेकरांच्या दैनंदिन जीवनावर वाहतूक कोंडीचा परिणाम होऊ नये, यासाठी सुरक्षित, सुकर आणि शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था उभारण्यास आम्ही ठामपणे कटिबद्ध आहोत. नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी समन्वयाने काम करतील.

या बैठकीस वाहतूक शाखेचे पोलीस आयुक्त पंकज शिरसाठ, भाजप शहर सरचिटणीस डॉ.राजेश मढवी, नगरसेविका प्रतिभा मढवी, नगरसेविका मृणाल पेंडसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सात नव्या 'हायस्पीड' रेल्वेंना गती, उच्चस्तरिय बैठकीत महत्त्वाचा निर्णय

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, पुणे :** देशातील नव्या सात हायस्पीड (उच्चगती) रेल्वे प्रकल्पांच्या तातडीच्या अंमलबजावणीसाठी रेल्वे बोर्डाने महत्त्वपूर्ण मार्गदर्शक सूचना सोमवारी जारी केल्या आहेत. केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या सात नव्या हायस्पीड कॉरिडॉरच्या वेळेत पूर्ततेसाठी रेल्वे बोर्डस्तरावर उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली असून, त्यानंतर अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.



केंद्रीय अर्थसंकल्पात सात उच्चगती रेल्वे कॉरिडॉरमध्ये मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बेंगळुरू, हैदराबाद-चेन्नई, चेन्नई-बेंगळुरू, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलीगुडी यांचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पांची जबाबदारी 'नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड' कडे (एनएचएसआरसीएल) सोपविण्यात आली आहे. रेल्वे बोर्डाने यापूर्वी तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांमध्ये (डीपीआर) सध्याच्या खर्चानुसार आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे प्रकल्पाचा अचूक आर्थिक अंदाज लावता येईल. तसेच, देशभरातील उच्चगती रेल्वेसाठी एकसमान तांत्रिक व परिचालन मानके निश्चित करण्याचे कामही 'एनएचएसआरसीएल'कडे सोपविण्यात आले आहे.

प्रत्येक प्रकल्पासाठी क्षेत्रनिहाय टीम स्थापन करणे, प्रकल्पनिहाय मुख्यालय निश्चित करणे, पूर्वबांधकाम प्रक्रिया पूर्ण करणे आणि करार प्रक्रियेची तयारी सुरू करण्यावर भर देण्यात आला आहे. या संपूर्ण कार्ययोजनेच्या प्रगतीचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. यासोबतच तांत्रिक मनुष्यबळाची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**मुंबईसाठी १,४९७ कोटी रुपये प्रस्तावित...**

मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी २०२६-२७ या वर्षासाठी १४९७ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहेत. जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत ११०२.७४ कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, १०० टक्के निधी खर्च होण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी दिल्या.

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीची बैठक मंगळवारी वांद्रे येथील चेतना महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री आशिष शेलार, सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा हे होते. सभेला जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा नियोजन अधिकारी संजयकुमार शिंदे यांच्यासह नियोजन समितीचे सदस्य, खासदार, आमदार तथा विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपनगरांत वाहतूक कोंडीच्या समस्यांवर उपाययोजना करणे, तसेच ड्रग माफियांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश शेलार यांनी दिले.

# गर्दी हवी अन् दर्दीही हवेतच!



गेल्या महिन्यात साताऱ्याला ९९ वे मराठी साहित्य संमेलन थाटात पार पडले. राज्य शासनाच्या भरघोस आर्थिक साहाय्यामुळे अलीकडे संमेलने टोलेजंग आणि पर्यायाने यशस्वी होऊ लागली आहेत. मात्र, आता शहर-जिल्हा स्तरावरही मराठी भाषेशी संबंधित छोटेखानी 'लिट फेस्ट' वा साहित्य-संस्कृती संमेलनांचे प्रमाणही वाढले आहे. शासन स्तरावरून स्वयंसेवी वा अन्य संस्था-संघटनांना आर्थिक अनुदान मिळू लागल्याने असे उपक्रम वाढणे ही समाधानाची गोष्ट. परंतु, ही संमेलने खरोखर लोकांपर्यंत पोहोचत आहेत का, मराठी भाषा, कला-संस्कृतीचे संवर्धन, प्रचार-प्रसार ही उद्दिष्टे साध्य होत आहेत का, हे कधीतरी तपासून पाहायला हवे.

ठाणे-पालघरमधील एका संस्थेने नाशिकमध्ये नुकताच बहुभाषिक साहित्य व कला महोत्सव आयोजित केला. एका शैक्षणिक संस्थेच्या आवारात झालेल्या या महोत्सवात नामवंत अभिनेते, लेखक सहभागी झाले. तीन दिवस भरगच्च कार्यक्रम झाले. मात्र, नाशिकमधील बहुतांश रसिकांना याची खबरबातही नव्हती. परिणामी, महोत्सवातील सुरुवातीच्या दोन दिवसांतील बहुतांश कार्यक्रम रिकाम्या खुर्च्यांनाच पाहावे लागले. महोत्सवात प्रमुख पाहुण्यांनी राजकीय व्यवस्थेवर आसूड ओढल्याचे वाचल्यानंतर मुंबई-पुण्यातील सारस्वतांनी दूरध्वनी करून हा 'फेस्ट' नेमका काय आहे, त्याचे आयोजक कोण आहेत, याची विचारणा सुरू केली. देश खोट्याच्या आधारे चालवला जात असून, 'फेक नरेटिव्ह' ओरडून ओरडून पसरवले जात असल्याचे मुद्दे वक्त्यांनी त्यात तळमळीने मांडले. परंतु, दुर्दैवाने समोर पाच-पंचवीस डोकीही उपस्थित नसल्याने वक्त्यांचा हिरमोड झाला. अर्थात, 'मटा'ने वक्ते व परिसंवादांतील जाणकारांचे अभिप्राय जनतेपर्यंत पोचविण्याचे कर्तव्य नेटाने बजावलेच; परंतु कार्यक्रमाला श्रोतेच नसल्याची रुखरुख साऱ्यांना जाणवली.

अनेकदा अननुभवी संस्थांकडून असे महोत्सव घेतले जातात, त्याच्या यशस्वी आयोजनासाठी त्यांच्याकडून प्रामाणिक प्रयत्नही होतात. मात्र,उपक्रम लोकांपर्यंत न पोचल्याने त्यांचे परिश्रम वाया जातात. नाशिकमधील महोत्सवाबाबतही ऐन वेळी केलेली घोषणा, पूर्वप्रसिद्धीचा अभाव, नियोजनातील असमन्वय, प्रसार-प्रचारासाठी निव्वळ सोशल मीडियावरील अवलंबित्व या त्रुटी राहिल्या. सध्या शहरा-शहरांत अनेक संस्थांवर अशी नामुष्की ओढावते आहे.

कुसुमाग्रजांच्या नावाने स्थापन झालेल्या एका संस्थेनेही नाशिकमध्ये काही महिन्यांपूर्वी मराठी भाषा व संस्कृती परिषदेचे आयोजन केले होते. कार्यक्रमांची रूपरेषा चांगली होती. वक्ते उत्तम असल्याने मराठी भाषेसंबंधीचे परिसंवाद रंगले. परंतु, त्यांचे विचार ऐकण्यासाठी लोकच नव्हते. वक्त्यांना भले मानधनाचे पाकीट मिळत असेल; परंतु शहराची अरसिकता मनाशी साठवत ही मंडळी परतत असतील, तर ती पुन्हा येण्यास धजावतील?

शहर वा जिल्ह्यांपुरती छोटी संमेलने भरवणे ही चांगली बाब असली, तरी स्थानिक कलाकार-लोकांच्या सहभागाशिवाय ती यशस्वी होऊ शकत नाहीत. कोणत्याही कलेसाठी राजाश्रय महत्त्वाचा असतो. तो मिळत असताना साहित्य-कलाप्रेमींनी मागे राहून चालणार नाही हे खरेच; पण केवळ अनुदाने वा कोणाच्या आर्थिक सहाय्यातून असे कार्यक्रम उरकले जाणार असतील, तर उद्या राजकीय सभांप्रमाणे कला-संस्कृतीच्या महोत्सवांनाही भाडोत्री गर्दी आणली गेल्यास आश्चर्य वाटू नये. तशा एजन्सी सक्रिय झाल्याच आहेत. अर्थात, राज्यातील श्रोते-प्रेक्षक दर्दी असल्याने ती वेळ इतक्यात तरी येण्याची शक्यता नाही. भाषा-संस्कृतीसाठी काम करणाऱ्या संस्था वा कलारसिकांचा उपमर्द करण्याचाही येथे हेतू नाही. परंतु, अशा कार्यक्रमांचे आयोजन करताना स्थळ, काळ, वेळेसह सगळ्याच बाबींचा बारीकसारीक विचार व्हावा, हा मुद्दा अधोरेखित होणे महत्त्वाचे.

**- संपत थेटे**

# आता चुकीला माफी नाही !

बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू झाल्या आहेत. यावर्षी सर्व परीक्षा केंद्रे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कक्षेत आणण्यात आली आहेत. त्यामुळे परीक्षार्थी आणि पर्यवेक्षक या दोघांवरही बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. पहिल्याच दिवशी काही केंद्रांवर कॉपी करताना विद्यार्थी आणि त्यांना मदत करणारे पर्यवेक्षक कॅम ेऱ्यात कैद झाले. आता त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

आजचा काळ हा सतत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नजरेखाली राहण्याचा झाला आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपले आचरण नैतिक ठेवण्याची जाणीव कायम ठेवणे आवश्यक बनले आहे. त्याचबरोबर सोशल मीडियाच्या या युगात आपला मोबाईलही आपल्या वर्तनाची नोंद घेत आहे. आज शाळा, महाविद्यालये, दवाखाने, बसस्थानके, रेल्वे स्टेशन, कार्यालये, धार्मिक स्थळे तसेच बाजारपेठाया सर्व ठिकाणी सीसीटीव्हीचे डोळे आपल्यावर सतत लक्ष ठेवून असतात. उपरवाला देख रहा है! अशीच परिस्थिती आता निर्माण झाली आहे. मोबाईलमुळे आपले लोकेशन ट्रॅक होत आहे आणि आपल्या अगदी बारीकसारीक सवयींचीही नोंद घेतली जात आहे.

माणूस हा जैविक प्राणी आहे. त्याला विश्रांतीसाठी आणि काही वैयक्तिक गोष्टींसाठी एकांताची गरज असते. पण आजच्या काळात तो एकांतही हळूहळू नाहीसा होत चालला आहे. संगणक आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे समाजावर पूर्णपणे नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. मोबाईलच्या माध्यमातून प्रचंड प्रमाणात आपल्याविषयीचा डेटा गोळा केला जात आहे.



दिवसाचे चोवीस तास आपण काय करतो, कुठे जातो, कोणाशी बोलतोहे सर्व बारकाईने पाहिले जाऊ शकते.

ज्याप्रमाणे बँका कर्ज देताना आपला सिबिल स्कोअर तपासतात, त्याचप्रमाणे भविष्यात नोकरी देताना, विवाह जुळवताना, मैत्री करताना, पोलिस रेकॉर्ड तयार करताना इतकेच नव्हे तर न्यायालयात शिक्षा ठरवताना सुद्धा आपला सोशल क्रेडिट स्कोअर तपासला जाऊ शकतो. व्यक्तीच्या वर्तनावर आधारित हा सोशल क्रेडिट स्कोअर तयार केला जाईल आणि त्यावरून तिची सामाजिक प्रतिष्ठा ठरवली जाईल.

एखाद्या अपंग व्यक्तीला मदत केल्यास तुमचा सोशल क्रेडिट स्कोअर वाढेल, तर सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून गोंधळ घातल्यास तो कमी होईल. वृद्ध व्यक्तीला रस्ता ओलांडून देणे हे सकारात्मक गुण मानले जातील, तर रात्री उशिरा पार्टी करून शेजाऱ्यांना त्रास देणे नकारात्मक ठरेल. त्याचप्रमाणे वाहतुकीचे नियम मोडणे, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान किंवा थुंकणे, अश्लील सामग्री पाहणे, कॅन्टीनमध्ये चहा पिताना केलेली बेजबाबदार संभाषणेअशा अनेक गोष्टींची नोंद घेतली जाऊन तुमचा सोशल क्रेडिट स्कोअर कमी होऊ शकतो. या स्कोअरवरच भविष्यात तुम्हाला रेल्वे तिकीट मिळेल की नाही, महाविद्यालयात प्रवेश मिळेल की नाही, किंवा नोकरीत प्राधान्य दिले जाईल की नाहीहे ठरू शकते. विम्याचा हप्ता सुद्धा तुमच्या सोशल क्रेडिट स्कोअरवर आधारित ठरवला जाईल.

सर्वव्यापी पाळत ठेवणारे तंत्रज्ञान आणि सोशल क्रेडिट अल्गोरिदम्स यांनी समाजातील प्रतिष्ठा आणि यशाच्या सर्व स्पर्धांना एकाच, कधीही न संपणाऱ्या शर्यतीत बदलण्याचा मोठा धोका निर्माण केला आहे. यामुळे भविष्यात लोकांना प्रचंड तणावपूर्ण जीवनशैलीत जगावे लागेल. पैसा गमावण्यापेक्षा नाव, चेहरा किंवा प्रतिष्ठा गमावण्याची भीती अधिक वाटू लागेल. सोशल क्रेडिट स्कोअरमुळे समाज अधिक नीतिमान बनेल की अधिक विद्रोहीहे येणारा काळच ठरवेल. मात्र इतके निश्चित आहे की आता चुकीला माफी नाही हे वाक्य केवळ परीक्षांपुरते मर्यादित न राहता संपूर्ण आयुष्याचे वास्तव बनू पाहत आहे.

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

## कुरुप

शोकाकुलमनस्थिती
गळून पडलायं हुरुप
साळसूदते वावरतात
चेहरे अ संख्य कुरुप

शोमस्ट गोऑन बोले
दाखवी नवीन स्वरुप
जनेच्छा जाणूनि घेई
राज्यराहावे सुखरूप

काही बाही बोलू नये
तोंडाला घाला कुलुप
निदान राख आहे तो
का रहात नाहीत चूप

विषय उसळू पाहतो
सळाळून उठला धूप
सजलेसगळे लावायं
आपल्यापोळीस तूप

निवांत चाले चौकशी
पुरावेबसले चिडीचूप
कारण निसटूनजाती
सावकाशपणेगुपचूप

उपस्थित होती शंका
माणसे अगदी विद्रुप
अफवा भडकत राहे
समस्त होतात तद्रुप

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना सम जले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले.

चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली.

तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या म ोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले.

या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते.

पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण म ांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर म ाघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## शरद लोहकरे यांचा 'राष्ट्रीय समाज रत्न' पुरस्काराने गौरव



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, नाशिक** : भारतमाता संस्थेच्या म ाध्यमातून समाजातील विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत वंचित घटकांचा सन्मान करण्याचे, तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक दिशा देण्याचे कार्य करणारे लासलगाव येथील सामाजिक कार्यकर्ते शरद दामोधर लोहकरे यांना 'राष्ट्रीय समाज रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ग्राहक सेवा सामाजिक बहुउद्देशीय संस्था संचलित ग्राहक रक्षक समितीच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त हॉटेल सेलिब्रेटी, नाशिक येथे आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**या मान्यवरांची होती उपस्थिती :**

या कार्यक्रमास ग्राहक रक्षक समितीच्या राष्ट्रीय संस्थापक अध्यक्षा डॉ. आशाताई पाटील, राष्ट्रीय महिला अध्यक्षा डॉ. ज्योतीताई केदारे शिंदे, येवला विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार कल्याणराव पाटील, शिवसेना नेते तथा माजी नगरसेवक अजय बोरस्ते, अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म हेश चौधरी, राष्ट्रीय मार्गदर्शक दिलीप फडोळ, अनिल गिरणारे, राष्ट्रीय प्रवक्ता संजय देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

# चोरीस गेलेले सुमारे १५ लाख रुपयांचे १०.५ तोळे सोने दोन महिन्यांत फिर्यादीस परत

## राहुरी पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.११, राहुरी :** राहुरी येथे घरफोडीच्या गुन्ह्यात चोरीस गेलेले सुमारे १५ लाख रुपये किमतीचे १०.५ तोळे सोने राहुरी पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांच्या संयुक्त तपासातून जप्त करण्यात आले असून ते आज फिर्यादीस परत करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी भास्कर भागवत कोळी (रा. राहुरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. १३५३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.



सदर गुन्ह्याचा तपास राहुरी पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी संयुक्तरीत्या करत चोरीस गेलेले सुमारे १५ लाख रुपये किमतीचे सोने हस्तगत करण्यात यश मिळवले.

जप्त केलेले सोने मा. अपर पोलीस म हासंचालक कृष्ण प्रकाश यांच्या हस्ते मा. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुरमे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या उपस्थितीत फिर्यादी यांना परत करण्यात आले.

यावेळी फिर्यादी भास्कर कोळी यांनी राहुरी पोलीस स्टेशनचे पथक व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे आभार मानत त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## 'हिंद दी चादर' कार्यक्रमाची नवी मुंबईत विद्यार्थ्यांद्वारे जनजागृती




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, नवी मुंबई :** श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी दिनानिमित्त धर्म, मानवता व बलिदानाचे प्रतीक म्हणून हिंद दी चादर कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक विद्यालय शाळा क्रमांक १०३, ऐरोली येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शिक्षण विभागाच्या सहा.आयुक्त दिपाली दिवेकर यांचेसह गुरूनानक दरबार गुरुद्वाराचे प्रमुख पदाधिकारी ग्यानी बाबा विक्रम सिंग, तजेंदर सिंग सोंद आणि सहकारी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका ललिता वाणी तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी ग्यानी बाबा विक्रम सिंग यांनी 'हिंद की चादर' या संकल्पनेविषयी सखोल माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. काही विद्यार्थ्यांनीही आपल्या भाषणामधून 'हिंद दी चादर' विषयावर विचार मांडत श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांचा त्याग, शौर्य व धर्मनिष्ठेचे महत्त्व अधोरेखित केले.

सहा. आयुक्त दिपाली दिवेकर यांनी शासन निर्णयानुसार हा कार्यक्रम महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये अनिवार्य करण्यात आला आहे यामागील भूमिका व उद्देश स्पष्ट केला आणि विद्यार्थ्यांना मानवता, सहिष्णुता व मूल्यसंस्कारांचे महत्त्व पटवून दिले. यावेळी शिक्षक, विद्यार्थ्यांनी परिसरात रॅली काढून जनजागृती केली.

## नायगांव येथे आजपासून अखंड हरिनाम सोहळ्याला प्रारंभ

**अक्षराज : विकास वाघ**

**दि,१२, धाराशिव :** कळंब तालुक्यातील नायगांव येथे प्रतिवर्षाप्रमाणे वै गुरुवर्य ह.भ.प.हरिभाऊ महाराज सुगांवकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त भागवत हरिभाऊ पाटील यांच्या शेतातील वै ह.भ.प. हरिभाऊ महाराज सुगांवकर यांच्या समाधी समोर दि.१२ गुरूवार ते दि.१८ बुधवार अखंड हरिनाम सोहळ्याला प्रारंभ होत आहे. तरी परिसरातील सर्व भाविक भक्त व शिष्य भजनी मंडळींनी या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. या सोहळ्यात विष्णु सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ, किर्तन, हरिजागर, काकडा आरती व भजन आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी प्रवचनकार ह.भ.प. कुलदिप महाराज नायगांव, ह.भ.प. लिंबराज महाराज पाडे पिंपरी, ह.भ.प. सखाहरी महाराज पालकर सौंदना, ह.भ.प. आचार्य सुरेशानंदजी महाराज हिमालय हरिद्वार, ह.भ.प. दिनेश महाराज एकुरगा, ह.भ.प., बळीराम महाराज औताडे पिंपळगाव, किर्तनकार आहे ह.भ.प., महादेव महाराज बोराडे औरंगपुरा, ह.भ.प. बळीराम महाराज काळे सुगावकर, ह.भ.प.अच्युत महाराज पुरी सोलापूर, ह.भ.प. दत्ता महाराज अंबिरकर डिकसळ, ह.भ.प.जगन्नाथ महाराज देशमुख पंढरपूर, ह.भ.प. किशोर महाराज सुर्यवंशी आरजखेडा, तसेच दि.१८ बुधवार रोजी काला किर्तन ज्ञानसिंधू गुरुवर्य ह भ प संदिपान महाराज हसेगांवकर यांचे होणार आहे. तरी परिसरातील सर्व भाविकांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन भागवत हरिभाऊ शितोळे पाटील व बालासाहेब शिंदे चाकुर व भजनीं मंडळ नायगांव यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## नॅशनल उर्दू हायस्कूलमध्ये स्नेहसंमेलन व निरोप समारंभ उत्साहात



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** शिक्षक विद्यार्थ्यांना संस्कारांनी घडवतात आणि प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणच खरा आधार ठरते, असे प्रतिपादन लासलगाव कृ.ऊ.बा.स. संचालिका सोनिया होळकर यांनी केले. लासलगाव नॅशनल एज्युकेशन सोसायटी संचलित नॅशनल उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा वार्षिक स्नेहसंमेलन आणि इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला, त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक हिंदूस्थानचे संपादक नायाब अन्सारी होते. यावेळी व्यासपीठावर सुवर्णाताई जगताप, प्रकाश दायमा, सरपंच ॲड. तुकाराम जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

**कार्यक्रमाची वैशिष्ट्ये :**

सत्कार समारंभ: नामको बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश दायमा, नवनिर्वाचित नगरसेवक आणि राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार विजेते अय्युब शाह व सागर निकाळे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

**मार्गदर्शन :** सुवर्णाताई जगताप यांनी मुलींच्या प्रगतीवर भाष्य करत विद्यार्थ्यांनी शिक्षण खंडित न करण्याचे आवाहन केले.

**सांस्कृतिक मेजवानी :** विद्यार्थ्यांनी उर्दू, हिंदी आणि मराठी गाण्यांवर बहारदार नृत्ये सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

**भावनिक निरोप :** निरोप समारंभात विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष हारून शेख यांनी केले. सूत्रसंचालन अकीला खान व सय्यद बाबा यांनी केले, तर प्राचार्या सलमा सुल्ताना मन्सूरी यांनी आभार मानले. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एका मताने इतिहास घडविला !

## चंद्रपुरात भाजपची सरशी ; संगीता खांडेकर ठरल्या नव्या महापौर






**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदांच्या निवडीसाठी मा. पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या अध्यक्षतेखाली आज सकाळी ११ वाजता मनपाच्या राणी हिराई सभागृहात विशेष सभा पार पडली. या सभेत भारतीय जनता पक्षाच्या संगीता राजेंद्र खांडेकर यांची महापौरपदी तर अपक्ष उमेदवार प्रशांत आनंदराव दानव यांची उपमहापौरपदी निवड झाली.

महापौर पदासाठी एकूण १० नामनिर्देशन पत्रे दाखल झाली होती. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून मनस्वी संदीप गिऱ्हे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाकडून संगीता मंगल भोयर, संगीता गोपालकृष्ण अमृतकर, सुनंदा दिलीप धोबे. व वैशाली अजय महाडोळे, तर भारतीय जनता पक्षाकडून संगीता राजेंद्र खांडेकर, व सारिका सचिन संदुरकर यांनी अर्ज सादर केले होते. अर्ज मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या कालावधीत मनस्वी संदीप गिऱ्हे, संगीता मंगल भोयर, संगीता गोपालकृष्ण अमृतकर, सुनंदा दिलीप धोबे व सारिका सचिन संदुरकर यांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या वैशाली अजय महाडोळे व भारतीय जनता पक्षाच्या संगीता राजेंद्र खांडेकर यांच्यात थेट लढत झाली. हात उंचावून मतदान घेण्यात आले असता वैशाली महाडोळे यांना ३१ तर संगीता खांडेकर यांना ३२ मते मिळाल्याने एका मताच्या फरकाने संगीता खांडेकर यांची महापौरपदी निवड झाली.

उपमहापौर पदासाठी अपक्ष उमेदवार प्रशांत आनंदराव दानव, भारतीय शेतकरी कामगार पक्षाकडून प्रदीप शंकर देशमुख, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाकडून वसंत राजेश्वर देशमुख व राहुल गेंदलाल चौधरी, तसेच भारतीय जनता पक्षाकडून संजय नारायण कंचर्लावार यांनी अर्ज दाखल केले होते. यापैकी संजय नारायण कंचर्लावार, वसंत राजेश्वर देशमुख व राहुल गेंदलाल चौधरी यांनी ठराविक कालावधीत आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे प्रशांत आनंदराव दानव व प्रदीप शंकर देशमुख यांच्यात लढत झाली. मतदानात दोघांनाही प्रत्येकी ३२ मते मिळाल्याने ईश्वरचिठ्ठी काढण्यात आली. त्यात अपक्ष उमेदवार प्रशांत आनंदराव दानव यांची उपमहापौरपदी निवड झाली.

ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएम आयएम) पक्षाच्या एकमेव सदस्याने केवळ उपमहापौर पदासाठी मतदान केले असून महापौर पदासाठी तटस्थ भूमिका घेतली. वंचित बहुजन आघाडीचे दोन सदस्य निवडणूक प्रक्रियेत अनपस्थित असल्याने ६६ पैकी ६४ सदस्यांनी निवडणूक प्रक्रियेत भाग घेतला.

या निवडणूक प्रक्रियेदरम्यान पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी कामकाज पाहिले. यावेळी महानगरपालिका आयुक्त अकुनूरी नरेश, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त संदीप चिद्रवार, नगरसचिव नरेंद्र बोबे, शहर अभियंता रवींद्र हजारे, सहायक आयुक्त शुभांगी सुर्यवंशी तसेच मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यादीप विद्यालयात विविध उपक्रमाचे आयोजन

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१०, नवी मुंबई :** विद्यादीप विद्यालय कोपरखैरणे येथे विश्व गौरव परमपूज्य गगनगिरी महाराज यांच्या समाधी सोहळा निमित्त विद्यादीप विद्यालय कोपरखैरणे येथे माननीय मुख्याध्यापिका गवळी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य पालखी सोहळा, हळदी कुंकू समारंभ, मातृ पूजन, डिजिटल मेला व निपुण माता मेळावा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला.

सर्वप्रथम गगनगिरी महाराज परमभक्त लहू सावंत महाराज, रामदास सुर्वे महाराज, सुखदेव जाधव यांच्या हस्ते गगनगिरी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून आरती घेऊन पारंपारिक वेशभूषेत विद्यार्थी शिक्षक व पालक यांच्यासह पालखी मिरवणूक काढण्यात आली. या पालखी दरम्यान ढोल ताशा टाळ लेझीमच्या घोषात फुगडी, बस फुगडी असे पारंपारिक खेळ घेत पालखी सेक्टर १ ते ४ या विभागात काढण्यात आली. यानंतर आई आपल्यासाठी करत असलेल्या कार्याबद्दल तिची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यालयात मातृ पदपूजन कार्यक्रमही घेण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे पूजन करून आशीर्वाद घेतला. यानंतर याच कार्यक्रमाचे औचित्य साधून सालाबाद प्रमाणे याही वर्षी विद्यालयांच्या महिला पालकांसाठी हळदीकुंकू



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत महिलांसाठी उखाणा स्पर्धा पारंपारिक वेशभूषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धेत उखाणा स्पर्धेमध्ये अश्विनी सणस प्रथम क्रमांक अश्विनी दुधे द्वितीय क्रमांक शीतल कदम तृतीय क्रमांक विजयी झाल्या. यानंतर वेशभूषा स्पर्धेत निर्मला तुपे प्रथम क्रमांक पूजा पवार द्वितीय क्रमांक ज्योती वाघमारे तृतीय क्रमांक विजयी झाल्या. बॉल बॅलेंसिंग स्पर्धेत मीनाक्षी डोके प्रथम क्रमांक, सुविधा पाटील द्वितीय क्रमांक, निर्मला तुपे तृतीय क्रमांकाने विजयी झाल्या विजयी महिलांना कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. तसेच निपुण माता पालक यांचा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्या अंतर्गत माता पालकांनी कृती करणे, बॉल जमा करणे, बलून बॅलन्स या खेळाचे प्रात्यक्षिक केले.

यानंतर प्रथम फाउंडेशन संस्थेमार्फत संगणक शिक्षिका सौ राखी मदने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी डिजिटल मेळा आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तसेच आजच्या समस्येवर आधारित विज्ञान प्रयोग वर्किंग मॉडेल तसेच सायबर सेफ्टी अशा प्रयोगातून समाजात होत असलेल्या बदलांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या कार्यक्रमासाठी गगनगिरी महाराजांचे भक्त लहू सावंत महाराज, रामदास सुर्वे महाराज, सुखदेव जाधव, तसेच स्थानिक नगरसेविका सायली ताई शिंदे, छायाताई शिंदे, विजय शिंदे शाळेचे अध्यक्ष योगेश हन्नूरकर विजेता शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शेख, लेक लाडकी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा अनिता माने, समाजसेवक वसंत जाधव इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रम माननीय मुख्याध्यापिका नेहा गवळी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला

या कार्यक्रमासाठी शितल जूनघरे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले. तसेच दीपक नवले, अमोल खिल्लारे, चंद्रकांत बरफ, मनीषा शिळीमकर, ज्योती ससाने, रेश्मा धुमाळ, शिल्पा मोरे, सविता सावंत, सुवर्णा चासकर ,मोनिका यादव, सुधा शर्मा, वर्षा शिर्के, इत्यादी शिक्षकांच्या मदतीने कार्यक्रम पार पडला. अशा या ज्ञानाकडून अध्यात्मा कडे नेणाऱ्या कार्यक्रमाचे सर्व पालकांकडून कौतुक झाले.

# रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादीचीं जोरदार मुसंडी सुधाकर घारे यांचे कर्जत खालापूर मध्ये वर्चस्व

## तटकरेंची 'ती' रणनीती ठरली यशस्वी !

**अक्षराज : स्वप्नील देशमूख**

**दि.११, कर्जत (रायगड) :** रायगड जिल्हा परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ पाहायला मिळाली आहे. या निवडणुकीत ५९ जागांसाठी मतदान झाले असून, शिवसेनेने जरी सर्वाधिक जागा जिंकल्या असल्या, तरी सर्वाधिक चर्चा ही राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) केलेल्या कामगिरीची होताना दिसत आहे. मर्यादित ताकद असतानाही राष्ट्रवादीने या निवडणुकीत १६ जागांवर विजय मिळवून राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधून घेतले आहे. विशेष म्हणजे, २०१७ च्या निवडणुकीच्या तुलनेत पक्षाने यंदा चार जागा अधिक जिंकल्या असून, या यशामागे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाशी केलेली युती अत्यंत निर्णायक ठरली आहे.

जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचे तीन आमदार असूनही त्यांना जे यश मिळवता आले नाही, ते राष्ट्रवादी काँग्रेसने करून दाखवले आहे. भाजपेक्षा राष्ट्रवादीची एक जागा अधिक निवडून आली आहे. या यशाचे मुख्य सूत्रधार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे असल्याचे बोलले जात आहे. कर्जत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीची संघटनात्मक



बांधणी चांगली असली, तरी शिवसेना शिंदे गटाच्या प्रभावामुळे यापूर्वी पक्षाला अपेक्षित यश मिळत नव्हते. मागील विधानसभा निवडणुकीत मतांच्या विभाजनामुळे शिवसेनेचे महेंद्र थोरवे विजयी झाले होते, तर तटकरे यांचे विश्वासू सुधाकर घारे यांनी अपक्ष निवडणूक लढवली होती. या अनुभवातून धडा घेत तटकरे यांनी यंदा अत्यंत धूर्त खेळी केली.

शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील मतविभाजन टाळण्यासाठी तटकरे यांनी कर्जत-खालापूर मतदारसंघात या दोन्ही पक्षांची युती घडवून आणली. सुरुवातीला नगरपालिकेच्या निवडणुकीत 'परिवर्तन आघाडी'च्या माध्यमातून हे दोन्ही पक्ष एकत्र आले आणि त्यांना तिथे सत्ता मिळाली.

हाच प्रयोग त्यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही राबवला. शिंदे गटाची ताकद रोखण्यासाठी आणि भाजप-शिंदे गट यांच्यात युती होऊ नये यासाठी पडद्यामागून हालचाली करण्यात आल्या होत्या.

या रणनीतीचा थेट परिणाम निवडणूक निकालांवर दिसून आला. कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या १० जागांपैकी ८ जागांवर 'परिवर्तन आघाडी'चे उमेदवार विजयी झाले. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने ५, तर शिवसेना ठाकरे गटाने ३ जागांवर आपले वर्चस्व निर्माण केले. कर्जतमध्ये राष्ट्रवादीचे ४ आणि खालापूरमध्ये १ उमेदवार निवडून आल्याने तटकरे यांची 'ठाकरे' गटाशी हातमिळवणी करण्याची खेळी पूर्णपणे यशस्वी ठरली आहे.


या युतीमुळे शिवसेना शिंदे गटाला जिल्हा परिषदेवर स्वबळावर सत्ता स्थापन करण्यापासून रोखण्यात मोठे यश मिळाले आहे. मात्र, आता जिल्हा परिषदेत सत्ता स्थापन करताना राष्ट्रवादी काँग्रेस भाजपसोबत जाणार का आणि तसे झाल्यास ते शिवसेना ठाकरे गटाला सोबत ठेवणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. तसेच, भाजप ठाकरेंच्या शिवसेनेला सोबत घेण्यास संमती देणार का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील ७५७ ग्रामपंचायतींवरील प्रशासक नियुक्तीला स्थगिती

## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर झेडपी मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांचे आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**


**दि.११, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील ७५७ ग्राम पंचायतींची मुदत संपल्याने संबंधित ग्रामपंचायतींचा कारभार विस्तार अधिकारी दर्जाच्या प्रशासकांच्या हातात दिला जाणार होता. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनात सर्वच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी प्रशासकांच्या नियुक्त्या केल्या होत्या. मात्र, या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल रिट याचिकेवर सुनावणी होवून प्रशासक नेमण्याच्या आदेशाला न्यायालयाने स्थगिती दिल्याने त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी गटविकास अधिकारी यांना पत्रक काढत प्रशासक नेमण्याची कार्यवाही न करण्याचे आदेश काढले आहेत.



अहिल्यानगर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. त्यामुळे गट आणि गणातील इच्छुक डोळे लावून बसले आहेत. त्यातच, आता ७५७ ग्रामपंचायतींच्याही मुदती संपल्या आहेत. यामुळे संबंधित ग्रामपंचायतींच्या सरपंचांचे अधिकार हे प्रशासकांकडे दिले जाणार होते. यापूर्वी डिसेंबर २०२५ अखेर मुदत संपलेल्या ११६ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबल्याने त्या ठिकाणी अगोदरच प्रशासक नियुक्ती करण्यात आली आहे. आता आणखी ७५७ ग्रामपंचायतींवर प्रशासन नेमले जाणार होत.

या ठिकाणी कृषी, शिक्षण, पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी, पाणी पुरवठा उपअभियंता, तसेच अंगणवाडी पर्यवेक्षक अशा संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नियुक्त्या देण्यात येणार होत्या. मात्र प्रशासक नियुक्तीप्रकरणी अरविंद दळवी व इतर त्यांच्या सहकाऱ्यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी होऊन पुढील आदेश येईपर्यंत कार्यवाही न करण्याचा सूचना न्यायालयाने दिल्याने त्यानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची कार्यवाही थांबवली आहे.

# श्री.ढोकेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



### महाशिवरात्री निमित्त विशाल भंडारा

महाशिवरात्री निमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने विशाल भंडाऱ्याच्या माध्यमातून साबुदाणा खिचडी महाप्रसादाचे आयोजन केले आहे. श्री ढोकेश्वराचे दर्शन झाल्यानंतर अनेक भाविक ढोकेश्वर विशाल भंडारा खिचडी महाप्रसादाचा लाभ घेतात. श्री ढोकेश्वराच्या साबुदाणा खिचडीचे एक वेगळेच वैशिष्ट्य आहे. ढोकेश्वर यात्रा व महाशिवरात्री या दिवशीचा महाप्रसाद भाविकांसाठी पर्वणी आहे. विशाल भंडारा कमिटीच्या वतीने दिवसभर हजारोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना पोटभर खिचडीचा प्रसाद वाटप करण्यात येते.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील पुरातन श्री.ढोकेश्वर महादेव मंदिर येथे वै. ह.भ.प विठ्ठल महाराज पायमोडे व वै. हभप बबन महाराज पायमोडे यांच्या कृपाशीर्वादाने तसेच ह.भ.प डॉ.नारायण महाराज जाधव व हभप डॉ. नारायण महाराज मिसाळ यांच्या प्रेरणेने महाशिवरात्रीच्या पर्वकाळात शनिवार, दि.१४ ते सोमवार, दि.१६ फेब्रुवारी पर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिलांमृत पारायण सोहळ्याचे आयोजन समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर व पंचक्रोशीतील सांप्रदायिक मंडळींनी केले आहे.

सप्ताह काळात दररोज पहाटे चार वाजता काकडा आरती, सायंकाळी सहा ते सात वाजता हरिपाठ, सायंकाळी सात ते नऊ वाजता हरिकीर्तन नंतर महाप्रसाद भोजन रात्री अकरा नंतर हरिजागर असे आध्यात्मिक कार्यक्रम होणार आहेत.

शनिवारी (दि.१४) रात्री होणाऱ्या कीर्तन सेवेमध्ये हभप धनंजय महाराज उदावंत (वासुंदे), तर रविवारी (दि.१५) रोजी सायंकाळी चार ते सहा वाजता महाशिवरात्री निमित्त शाहिर अण्णासाहेब चौरे व शाहिर किनकर आणि सहकलाकार यांच्या भेदिक कार्यक्रम, रात्री रामायणाचार्य हभप देविदास महाराज आडभाई (चांदा) यांचे कीर्तन होणार आहे. तर सोमवारी (दि.१६ ) कीर्तन केसरी हभप प्रेमानंद महाराज आंबेकर शास्त्री अण्णा यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी केले आहे.

# बारावीच्या पेपरला निघालेल्या विद्यार्थ्याचा लोकलमधून पडून दुर्दैवी मृत्यू

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.११, कळवा (ठाणे) :** बारावीच्या पहिल्याच पेपरसाठी घरातून निघालेल्या विद्यार्थ्यावर काळाने घाला घातल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. डोंबिवली येथील रहिवासी असलेल्या सोहम कटरे या विद्यार्थ्याचा लोकल ट्रेनमधून पडून अपघाती मृत्यू झाला.

ही घटना कळवा-मुंब्रा रेल्वे स्थानकांदरम्यान घडली असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. डोंबिवली येथील रहिवासी असलेला सोहम कटरे हा विद्यार्थी बारावीच्या पहिल्याच परीक्षेसाठी घरातून निघाला होता. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावी बोर्डाच्या परीक्षा आज पासून सुरू झाल्या आहेत. बारावीच्या पहिल्याच परीक्षेसाठी सोहम कटरे हा घरातून निघाला होता. त्याचं परीक्षा केंद्र कळव्यातील मनिषा विद्यालयात होतं. नेहमीप्रमाणे तो लोकल ट्रेनने प्रवास करत होता. मात्र, सकाळच्या वेळेत लोकलमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होती. या गर्दीमुळे सोहमचा तोल जाऊन तो चालत्या लोकलमधून खाली पडल्याची शक्यता




पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान या अपघातात सोहमचा जागीच मृत्यू झाल्याचं पोलिसांनी स्पष्ट केलं आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली. बारावीच्या पहिल्याच पेपरला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. तसेच, परिसरातील नागरिकांमध्येही हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा लोकल ट्रेनमधील प्रचंड गर्दीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.सकाळच्या गर्दीच्या वेळी कळवा मुंब्रा स्टेशनवरील गर्दी बाबत गेले ४ महिने कळवा मुंब्रा प्रवासी संघर्ष समिती रेल्वे प्रशासना विरोधात आंदोलन करीत असून याबाबतचे निवेदन मध्य रेल्वेच्या विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहे. अशातच आता रेल्वे प्रशासनाने कळव्यातील कारशेड मधून होणारी प्रवासी वाहतूक अनधिकृत वाहतुकीचे कारण पुढे करून बंद करण्याचे ठरविले आहे. प्रवासी संघर्ष समितीने कळव्यातील नागरिकांसाठी रेल्वे प्रशासनाकडे होम प्लॅटफॉर्मची मागणी केली असून होम प्लॅटफॉर्म सुरु झाल्याशिवाय कारशेड प्रवासी वाहतूक बंद करू नये अशी मागणी देखील लेखी पत्राद्वारे काण्यात आली आहे. सदर निवेदनाची प्रत कळव्यातील सर्व नगरसेवकांना देण्यात आली असून खासदार श्रीकांत शिंदे यांना देखील होम प्लॅटफॉर्म बाबत निवेदन देण्यात आले आहे. सकाळच्यावेळी कळवा स्टेशन मधून दररोज हजारो विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि इतर प्रवासी आपला जीव धोक्यात घालून प्रवास करत असल्याचं या घटनेतून समोर आलं आहे.

# नर्सिंग म्हणजे समाजसेवेचे पवित्र व्रत - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** येथील प्रियदर्शनी सभागृहात शासकीय नर्सिंग कॉलेजच्या वतीने नर्सिंग पदग्रहण सोहळ्याचे आयोजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास आमदार किशोर जोरगेवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नर्सिंग म्हणजे समाजसेवेचे पवित्र व्रत असल्याचे प्रतिपादन यावेळी बोलताना आ. किशोर जोरगेवार यांनी केले. या कार्यक्रमाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक महादेव चिंचोले, डॉ.जीवने, माया आत्राम, ज्योती लोटांगडे, परिचारिका पुष्पा पोडे, कामतवार, आदि मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमात बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, नर्सिंग हे केवळ एक व्यावसायिक क्षेत्र नसून समाजसेवेचे पवित्र व्रत आहे. रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानली जाते. रुग्णांच्या वेदना समजून घेत त्यांना मानसिक आणि शारीरिक आधार देण्याचे कार्य परिचारिका करतात. त्यामुळे आरोग्य व्यवस्थेचा कणा म्हणून नर्सिंग क्षेत्राकडे पाहिले जाते.

ते पुढे म्हणाले की, नर्सिंग शिक्षणाच्या माध्यमातून दरवर्षी अनेक युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. केवळ देशातच नव्हे तर परदेशातही आपल्या विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. सामाजिक बांधिलकी जपत, समर्पण आणि संवेदनशीलतेने ही तरुण पिढी आपली जबाबदारी पार पाडत आहे, याचा मनापासून आनंद आणि अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी शिस्त, संयम आणि सेवाभाव या




गुणांचे महत्त्व पटवून दिले. तुमच्या हातात केवळ इंजेक्शन किंवा औषध नसते, तर एखाद्या रुग्णाचा विश्वास आणि त्याच्या कुटुंबाची आशा असते. त्यामुळे प्रत्येक कृतीत संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव असली पाहिजे, असेही ते म्हणाले. यावेळी नर्सिंग कॉलेजच्या बस खरेदीसाठी ३० लाख रुपयांचा निधी देणार असल्याची घोषणाही यावेळी आ.किशोर जोरगेवार यांनी केली असून नर्सिंग कॉलेजच्या नवीन इमारतीसाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले.

# थोडक्यात

## डोंबिवलीतील रिक्षा भाड्यावरून वाद, वृद्धेला रुस्त्यात ढकलले!

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.११, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवलीतील मानपाडा रस्त्यावरील कस्तुरी प्लाझा येथून दावडी गाव येथे एक महिला आणि तिच्या नातेवाईकांना यायचे होते. या प्रवासासाठी त्यांनी रिक्षा निश्चित केली. रिक्षा चालकाने १२० रूपये भाडे सांगितले. दावडी येथे गेल्यावर रिक्षा चालकाने वाढीव ४० रूपये मागून एकूण १६० रूपये महिलेकडून घेतले. त्यानंतर एवढ्या लांब यायचे होते तर मग अगोदर तसे का निश्चित ठिकाण सांगितले नाही असे बोलून रिक्षा चालकाने वृध्द महिलेशी भांडण उकरून काढून तिला जोराने ढकलून दिले. महिला रस्त्यावर पडून तिच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे.

## मुंब्रा स्थानकात प्रवाशावर ब्लेड हल्ला: एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.११, मुंब्रा (ठाणे) :** मुंब्रा रेल्वे स्थानकाच्या कल्याण दिशेकडील पादचारी पुलावर डोंबिवलीतील ३० वर्षीय तरुणावर दोघांनी ब्लेडने वार करत मारहाण केल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. जखमी तरुण गांधीनगर कॉलनीतील रहिवासी असून डोंबिवलीतील एका शाळेच्या उपाहारगृहात काम करतो. तो मित्राला भेटण्यासाठी मुंब्रा येथे आला असताना दोघांनी त्याच्याकडे मोबाईल चोरीचा आरोप करत मोबाईल देण्याची मागणी केली व मारहाण केली. यावेळी एकाच्या हातातील ब्लेडने तरुणाच्या हातावर वार करण्यात आला. माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी हस्तक्षेप करून एक आरोपी ताब्यात घेतला, तर दुसरा फरार झाला. जखमीला कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. ठाणे लोहमार्ग पोलीस ठाण्यात बीएनएस २०२३ अंतर्गत कलम ११८(१) व ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## खापरखेडा सर्कल मधून सतीश दुधाने यांची कार्यकारणी सदस्यपदी निवड



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन चे २१ वे त्रैवार्षिक राज्य अधिवेशन सोलापूर येथे संपन्न झाले. याप्रसंगी संघटनेच्या केंद्रीय कार्यकारीणी सदस्य पदी सतीश मधुकर दुधाने यांची खापरखेडा सर्कल मधून निवड करण्यात आली. सतीश दुधाने हे संघटनेच्या विविध उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेत असतात. संघटनात्मक बांधणी, सदस्य मोहीम, सामाजिक उपक्रमाचे नियोजन तसेच विविध स्तरावरील बैठकांमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्व केले आहे. त्यांच्या समन्वय वृत्तीमुळे आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनामुळे संघटनेला भक्कम पाया मिळत आहे.

केंद्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून सतीश दुधाने यांच्यावर संघटनेच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत सहभाग नवीन योजना आखणी तसेच संघटनेच्या उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कर्तव्य तत्परतेचा संघटनेच्या वाटचालीत निश्चितच सकारात्मक परिणाम होईल असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. केंद्रीय कार्यकारिणी सदस्य पदी नियुक्ती केल्यामुळे संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष कॉ.मोहन शर्मा, सरचिटणीस कॉ.कृष्णा भोयर उपाध्यक्ष कॉ.एस.आर.खतीब यांचे खापरखेडा सर्कल तर्फे आभार व्यक्त करण्यात येत आहे. सतीश दुधाने यांचे विवेक गुंडरुकवार, महेश कुसरामे, राजेंद्र केमेकर, जॉन जोसेफ, शंकर ठाकरे, निखिल लुटे, नितीन येनवस्कर, निखिल घोडमारे, प्रवीण कोसे, संजय बरडे, संदीप गभणे, रिषभ माटे, सचिन पाटील, अनिल कैलुके, राजेश मेश्राम, किशोर भावे आदीनी अभिनंदन केले आहे.

## साहिल गिहे यांची विद्यार्थी काँग्रेसच्या प्रदेश सचीव पदावर निवड



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** विद्यार्थी व बेरोजगारांकरिता विविध कार्य करणारे साहिल कृष्णा गिऱ्हे यांची महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेसचे (NSUI) प्रदेश सचिव पदावर नुकतीच निवड करण्यात आली आहे. भविष्यात विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक समस्या आणि त्यांच्या मागण्यांसाठी लढा देण्याचे काम करण्यात येणार आहे. शिवाय संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीकोनातून सदस्यांची नोंदणी करण्यात येणार असल्याचे नवनियुक्त सचिव साहिल क्रिष्णा गिहे यांनी सांगितले. विद्यार्थी कांग्रेसच्या सचिव पदावर नियुक्ती केल्यामूळे माजी मंत्री महाराष्ट्र शासन सुनील केदार, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी सचिव प्रफुल गुडधे पाटील, भारतीय युवक काँग्रेस सचीव याज्ञवल्क्य जिचकार, भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सागर दादा साळुंके.कॅप्टन हेमंत कातुरे यांचे साहिल गिऱ्हे यांनी आभार मानले. उदय महाजन, हेमराज परिहार, रवींद्र चिखले, सरपंच मीनाक्षी तागडे, सुनील पांडे, आशिष राऊत, क्रिष्णा गि-हे, हरीश लोडेकर, धनराज डेहरिया, हेमराज सिंह प्रशांत हाते यांनी साहिल गिऱ्हे यांचे अभिनंदन केले आहे.